# <u>आदेश</u>

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- १२ डिसेंबर, १९९७.

## <u>महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१</u>

क्रमांकः- मत्स्यवि-१०९७/१३३६५/न.क्र.२००/पदुम१४(.)

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम,१९८१ (१९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.चौपन्न) यांच्या कलम ४, पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन उक्त कलम ४ च्या पोटकलम (२) च्या खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी विचारात घेऊन, उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये रचना करण्यात आलेल्या सल्लागार समितीशी विचार विनियम केल्यानंतर याद्वारे असा निर्देश देत आहे की,

(एक) ठाणे, बृहन्मुंबई,रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्हयांच्या प्रादेशिक सागरीसीमांमध्ये कोणत्याही यांत्रिक मासेमारी जलयानाच्या सहाय्याने मासेमारी करताना, ट्रॉल जाळयाच्या खोल भागाचा (Cod End) आस ३५ मि.मि.पेक्षा कमी ठेवता येणार नाही.

(दोन) रत्नागिरी जिल्हयाच्या प्रादेशिक सागरी सीमांमध्ये कोणत्याही यांत्रिक मासेमारी जलयानाच्या सहाय्याने मासेमारी करताना, ट्रॉल जाळयाच्या खोल भागाचा (Cod End) आस २५ मि.मि.पेक्षा कमी ठेवता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श्री.अ.का.शेख)
उपसचिव,महाराष्ट्र शासन.